

# दुभत्या म्हशींचे व्यवस्थापन

म्हैस हा काटक प्राणी आहे. दुग्धव्यवसायामध्ये दुधाळ गायींबरोबरच दुभत्या म्हशींचाही मोलाचा वाटा आहे. म्हशींचे खाद्य, आरोग्य व्यवस्थापन योग्य ठेवले तर त्या कमी आजारी पडतात.

दुग्ध व्यवसायात जातिवंत म्हशीची निवड, तसेच व्यवस्थापनाच्या दृष्टीने गोठ्याचे नियोजन महत्त्वाचे असते. यावरच व्यवसायाचे आर्थिक गणित अवलंबून असल्याने शेतकऱ्यांनी या गोष्टीकडे लक्ष देणे गरजेचे आहे. पशुवैद्यकाकडून म्हशीची प्रजननसंस्था चांगली असल्याचे निदान मिळाल्याशिवाय कोणतीही म्हैस खरेदी करू नये. प्रजननाच्या दृष्टीने कमरेचा भाग मोठा असावा, तर निरणाचा भाग सैलसर नसावा. दोन्ही निरणाच्या बाजू एकमेकांजवळ जास्तीत जास्त असून, चिकटल्यासारख्या राहाव्यात. म्हैस खरेदी करताना तिच्या लिखित नोंदी तपासण्याबाबत आग्रह असावा. म्हशीची वंशावळ आणि आरोग्य तपासून घ्यावे. जनावरांची निवड करताना संसर्गजन्य रोगांचा प्रादुर्भाव नसल्याची खात्री करणाऱ्या चाचण्या होणे अत्यंत आवश्यक असते. शुद्ध पैसाद आणि प्रजननक्षमतेचा नियमित आढावा घेत गेल्यास दूध उत्पादनात होणारी वाढ सहज लक्षात येऊ शकते; मात्र दूध उत्पादनातील खरी वाढ ही पशुपालकांच्या व्यवस्थापनातच दडलेली असते.

म्हशींचे दुधदोहण शांत वातावरणात करावे. कर्कश मोठा आवाज उदा. फटाक्यांचा आवाज, लाऊडस्पिकरचा आवाज याने म्हशी बिचकू शकतात. त्यांचे रवंथ कमी होते. दुधाचे प्रमाण कमी होते. यामुळे शांततेत दुध दोहन करावे. म्हशींवर उष्ण वातावरणात गार पाणी मारावे. थंडीत त्यांच्या अंगावर उबदार गोणे टाकावे. म्हशींना पाण्याचा फवारा, तुषार यापेक्षा डुंबण्यासाठी डोह अगर वेगळा हौद असेल तर उत्तम. सकाळी ११ ते दुपारी १ वाजेपर्यंत असे डुंबावयास सोडावे, ताज्या व्यालेल्या म्हशी व्याल्यानंतर सात-आठ दिवस डुंबावयास सोडू नयेत. त्यांना गोठ्यातच गार पाणी मारावे. म्हशींना नियमित वेळेवर ताजे, स्वच्छ पाणी पाजावे. प्रत्येक म्हशीला बसण्यासाठी आडवे रेलण्यासाठी पुरेशी जागा आवश्यक आहे. तशी जागा नसेल तर उठतांना एकमेकांच्या सडावर पाय पडून सडांना इजा होऊ शकते. म्हशींच्या गोठ्यातील जमीन निसरडी नसावी. नाहीतर म्हशी घसरुन त्यांचे पाय मोडू शकतात. अशा निसरडया जमिनीवरून उठताना मागच्या पायाच्या खुरांचा फटका सडावर-कासेवर बसतो व कासेला/सडांना इजा होते. म्हशींना बादलीने पाणी पाजत असताना किमान दिवसातून तिनदा पाणी पाजावे. म्हशी या सवयीच्या गुलाम आहेत. तेव्हा रोजचे खाद्य घटक यांत अचानक बदल करू नये. व्यवस्थापनात मोठा बदल करू नये. तिला जेवढे प्रेम द्याल तेवढी ती व्यवस्थित रूळेल व चांगले दूध देईल. दूध काढण्यापूर्वी त्यांना व्यवस्थित पान्हवावयास हवे. या बाबत जी सवय त्यांना लावू त्यावर तिचे पान्हवणे अवलंबून आहे. पाठीवर थाप मारणे, शिळ वाजवणे, भिजवलेले आंबोण समोर ठेवणे, कास कोमट पाण्याने धुणे इ. सवयी असु शकतात. दूध काढताना आंबोण द्यावयाचे अथवा लगेच नंतर द्यावयाचे हे त्यांना जी सवय लावू त्यावर अवलंबून आहे. पण एकदा का त्यांनी पान्हा सोडला की लगेच दूध काढावयास हवे.

म्हशींच्या खाद्यात नियमित मिनरल मिक्श्चर, संतुलीत आहार असणे आवश्यक आहे. दरवेळी ताजी व्यालेली नवीन म्हैस विकत घेण्याऐवजी घरच्या पारड्या वाढविण्यावर भर द्यावा. चांगली देखभाल केलेल्या पारड्या १८ ते २० महिने वयात असताना माजावर येऊन फळू शकतात.दरवर्षी म्हशींना न चुकता दोनदा घटसर्प प्रतिबंधक लस व दोनदा लाळ खुरकुत प्रतिबंधक लस पशुवैद्यकाच्या सल्ल्याने टोचून घ्यावी व जंतनाशक औषधे द्यावी. म्हशी बांधण्यासाठी साखळी वापरताना साखळी भोवती मऊ कापड सायकलची जुनी टयूब इ. बसवावे. म्हणजे म्हशीच्या मानेवर घट्टे पडणार नाहीत. पावसाळ्यात डास/चावऱ्या माशा यांच्या उपद्रवामुळे म्हशी शांतपणे रवंथ करू शकत नाहीत, त्यामुळे दूध कमी होते. यासाठी गोठ्यात योग्य व्यवस्थापन करावे. म्हशींना विण्यापूर्वी पंधरा दिवस आधी व व्याल्यानंतर पंधरा दिवसांनी जंतनाशक औषध द्या. त्यानंतर वर्षातून दोनदा द्या. (पावसाळ्यापूर्वी व पावसाळ्यानंतर) वासरांना वर्षातून ३ ते ४ वेळा जंतनाशके द्या. दर दोन-तीन महिन्यांनी म्हैस भादवून घ्यावी. भादरल्यानंतर एखादा दिवस त्या दुधाला कमी पडतात पण पुन्हा लगेच वाढतात. भादरल्यामुळे त्यांचे शरीर थंड रहाण्यास मदत होते. पिसवा, उवा, लिखा होत नाहीत. खराब डबक्यातल्या पाण्यात म्हशींना बसू देऊ नका. त्यांच्या अंगावर पित्ताच्या गाठी उठण्याची शक्यता आहे. डोंगरावर चरावयाला सोडलेल्या गाभण म्हशींच्या गर्भाशयाला पीळ पडण्याची शक्यता आहे. त्यामुळे काळजी घ्यावी.

प्रकाशन

महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ, नागपूर, संशोधन अनुदान अंतर्गत



म्हशींचा गोठा ही म्हशींसाठी महत्त्वाची आणि मुलभूत गरज असते. कार्यक्षमता आणि उत्पादकता वाढविण्यासाठी गोठा ही पशू व्यवस्थापनातील महत्त्वाची बाब समजली जाते. म्हशींच्या बाबतीत एक महत्त्वाची बाब म्हणजे म्हैस जितका वेळ बसेल तितके तिचे दूध उत्पादन वाढते; म्हणून गोठ्यामध्ये म्हशींना आरामात बसता येईल, एवढी प्रशस्त, हवेशीर, मोकळी, थंड जागा गोठ्यात उपलब्ध असावी. मोकळ्या गोठ्यात लंगडणे, पायांच्या जखमा आणि कासेच्या जखमा अत्यल्प प्रमाणात होतात, तर अपचन आणि सडाला जखम होण्याचे प्रमाणही फार मोठ्या प्रमाणात कमी होते.

गोठ्यात मुक्त वावरत असणाऱ्या म्हशी पुरेसा आहार, व्यायाम आणि पाणी सहज आणि वाटेल तेव्हा घेऊ शकतात. यातूनच त्यांची दूध उत्पादकता काही प्रमाणात वाढूही शकते. गोठ्यातील तापमान, आर्द्रता, वाऱ्याचा वेग आणि प्रकाश या सर्व बाबी अत्यंत महत्त्वाच्या असतात. गोठ्याचा मुख्य भाग हा त्यातील जमिनीचा असतो. शेण, मल-मूत्र साचणार नाही आणि सतत तो कोरडा होण्यास मदत होऊ शकेल, अशी रचना असलेला गोठा म्हशींसाठी नेहमी चांगला ठरतो. उतार असणारी आणि नेहमी कोरडी असणारी जमीन असल्यास गोठ्याची उपयुक्तता ५० टक्के पूर्ण होते. शक्यतो गुळगुळीत, निसरडी जमीन होणार नाही, याची वेळोवेळी काळजी घ्यावी.

गोठ्याच्या भिंती केवळ पाच ते सहा फूट एवढ्या उंच असल्या तरी पुरेशा ठरतात. या भिंती वीट बांधकामाच्या असाव्यात असे नाही. उपलब्ध दगड, माती यातून बांधलेल्या भिंती, तर या भिंतींच्यावर तेवढ्याच उंचीची लोखंडी जाळी भरपूर हवा खेळती रहावी या दृष्टीने अधिक उपयोगी पडते. गोठ्याचे छप्पर ही दुसरी महत्त्वाची बाब. पावसात म्हैस भिजली तरी नुकसान होत नाही; मात्र उनळ्यात तिच्या अंगाची होणारी आग मोठ्या प्रमाणात बाधक ठरते. गोठ्याचे छत हे सिमेंट पत्र्याचे असल्यास त्यावर गवताच्या पेंढ्याचे आच्छादन करावे. गोठ्याच्या शेजारी पाण्याचा हौद, कडबाकुट्टी यंत्र आणि शेणखताचा खड्डा असणे आवश्यक असते.

म्हशींना उष्णता अजिबात सहन होत नाही. वातावरणातील तापमानात होणारा बदल पचविण्यासाठी श्वासोच्छ्वास आणि शरीर तापमान यांची सांगड घालण्यासाठी म्हशींना अधिक काळ लागतो. गोठ्याच्या सभोवताली सावली असणारी उंच झाडे लावल्यास गोठ्यातील तापमान थंड राखण्यास मदत होते. म्हशींचा गोठा व त्यातील तापमान थंड करण्यासाठी गोठ्याच्या छतावर तापमान रोधक बाबी पसरणे आवश्यक असते.


प्रकाशन

**महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ, नागपूर, संशोधन अनुदान अंतर्गत**

www.mafsu.in

www.knpcvs.in

✻ मार्गदर्शक ✻

**कर्नल प्रा. (डॉ.) ए. एम. पातुरकर**
मा. कुलगुरु, मपमविवि, नागपुर

**डॉ. एस. व्ही. उपाध्ये**
अधिष्ठाता, पशुविज्ञान विद्याशाखा,
मपमविवि, नागपुर

**डॉ. एन. व्ही. कुरकुरे**
संचालक संशोधन,
मपमविवि, नागपुर

**डॉ. ए. यु. भिकाने**
संचालक विस्तार शिक्षण,
मपमविवि, नागपुर

**डॉ. व्ही. डी. आहेर**
सहयोगी अधिष्ठाता
क्रांनापापवैम, शिरवळ, जि. सातारा



✻ संकलन ✻

**डॉ. स्मिता आर. कोल्हे**
संशोधन प्रकल्प प्रमुख, पशुवैद्यकीय व पशुसंवर्धन विस्तार शिक्षण विभाग
क्रांनापापवैम, शिरवळ, जि. सातारा

संपर्क : टोल फ्री क्रमांक : १८००-२३३-३२६८ सकाळी १० ते सायं. ६ वा.